
# थोडक्यात





## साहित्य अकादमी साहित्य मंच आमंत्रण बाबाराव मुसळे, मोहन शिरसाटांना . अध्यक्षही मुळ वाशीमचे " कवठेकर "

▸ **निर्मल विदर्भ वाशीम ता.10**
**(प्रल्हाद पाटील पौळकर)**

नवी दिल्लीच्या साहित्य अकादमी व आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी ( दि.१९ ) सप्टेंबर २०२५ सकाळी १० वाजता अमरावतीच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहामध्ये , नवी दिल्लीचे साहित्य अकादमीचे सदस्य प्रमोद मुनघाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित साहित्य मंच कार्यक्रमांमध्ये साहित्य क्षेत्रात राज्यभर नावलौकिक असलेले वाशीम येथील कथा-कादंबरीकार बाबाराव मुसळे , अमरावतीचे सतीश तराळ यांना कथाकथन सादरीकरणास ,लोकप्रिय कविवर्य मोहन शिरसाट व अमरावतीच्या प्रसिद्ध कवयित्री डॉ.शोभा रोकडे यांना काव्य सादरीकरणासाठी तर आभार प्रदर्शनासाठी प्रा .सूवर्णा गाडगे यांना अधिकृतपणे निमंत्रीत करण्यात आले आहे. या साहित्य मंचाचे अध्यक्षस्थानी वाशिम जिल्ह्यातील मूळ कवठा येथील रहिवासी तथा प्रसिद्ध कवी नारायण कुलकर्णी कवठेकर हे जेष्ठ कवी असणार आहेत अशा प्रकारे साहित्य क्षेत्रात वाशिम जिल्ह्याचा "मानाचा तुरा"नवी दिल्ली पर्यंत पोहोचला आहे.

साहित्य अकादमी ही देशातील २४ भाषांमध्ये प्रतिष्ठेचे अकादमी पुरस्कार देते आणि पुस्तके प्रसिद्ध करीत असते. तसेच देशभर साहित्योत्सव आयोजित करीत असते. प्रादेशिक प्रतिभावंत साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे या साठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अंतर्गत 'साहित्य मंच' या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असते. 'साहित्य मंच' कार्यक्रमाला वाशिम जिल्ह्यातील साहित्य वर्तुळातील मंडळी सुद्धा मोठ्या संख्येने जाणार असल्याचे समजते.